बसवंत
हनी बी फेस्टिव्हल
दि. २१ ते ३० डिसेंबर २०२३
बसवंत गार्डन, मुखेड रोड,
पिंपळगाव बसवंत,
ता. निफाड, जि. नाशिक
(सकाळी १०.००
ते सायंकाळी ०५.००)

# मधाची गुणवत्ता आणि 'भूगोल' ठरविण्यासाठी केली जाते परागकणांची तपासणी!



**मधाची शुद्धता, त्याला ज्या पिकाचे नाव दिले आहे त्याची पडताळणी, ज्या भागातून मधाचे उत्पादन आले असेल त्याची तपासणी; तसेच ज्या देशाचे लेबल मधावर लावलेले आहे, त्याची सत्यता तपासण्यासारख्या बाबींसाठी मधामध्ये असलेल्या परागकणांचे परीक्षण केले जाते. त्याला मेलिसॉपॅलिनॉलॉजी म्हटले जाते.**



मधमाशी फुलांतून मकरंद- मध तसेच परागकण गोळा करत असते. तिच्या तोंडाद्वारे ती मकरंद घेते, तर तिच्या अंगावरच्या केसांवर तसेच पोलनबॅगमध्ये मोठ्या प्रमाणात परागकण जमा झालेले असतात. मधमाशी मध आणि परागकण तिच्या वसाहतीमध्ये वेगवेगळ्या कप्प्यांमध्ये साठवत असते. ज्या कप्प्यांमध्ये मध- परागकणांचा एकत्रित साठा असतो, ज्याला बी ब्रेड म्हणतात, त्याचा वापर मधमाशीच्या पिल्लांना खाण्यासाठी होतो. मधमाशी तिच्या वसाहतीमध्ये मधाचा साठा करत असताना तो अगदी शुद्ध स्वरुपात करते, त्यामध्ये कोणत्याही प्रकारची भेसळ नसते. अर्थात मधमाशी ज्या झाडांच्या फुलांतून मकरंद- मध गोळा करते त्यामध्ये अत्यंत अल्प प्रमाणात- ते आपल्याला दिसणारही नाहीत आणि ज्यांना आपण वेगळेही करू शकणार नाही अशा प्रमाणात परागकण असतात. यामुळे मध विकताना सूर्यफूल, मोहरी, बाभूळ, निलगिरी, जांभूळ, तुळस, लिची यासारख्या विविध पिकांची नावे देऊन मधाची विक्री केली जाते.

प्रत्येक मधाला वेगळी चव असते तसेच त्या मधाचे गुणधर्म वेगवेगळे असतात, ज्याचा वापर अनेकजण आपले आरोग्य चांगले ठेवण्यासाठी करतात. आज मोठ्या प्रमाणात ज्या मधाची विक्री केली जाते ती म्हणजे 'मल्टिफ्लोरा' मधाची- म्हणजे अनेक पिकांच्या फुलांपासून मिळविलेला मध. मधाची शुद्धता, त्याला ज्या पिकाचे नाव दिले आहे त्याची पडताळणी, ज्या भागातून मधाचे उत्पादन आले असेल त्याची तपासणी; तसेच ज्या देशाचे लेबल मधावर लावलेले आहे, त्याची सत्यता तपासण्यासारख्या बाबींसाठी मधामध्ये असलेल्या परागकणांचे परीक्षण केले जाते. त्याला मेलिसॉपॅलिनॉलॉजी म्हटले जाते.

मेलिसॉपॅलिनॉलॉजीद्वारे मधामध्ये असलेल्या परागकणांचे उगमस्थान, कोणत्या पिकाच्या फुलांपासून- तसेच कोणत्या भागातून, देशातून मधाचे उत्पादन घेतले आहे याची तपासणी करणे सोपे होते. यासाठी जगभरातील अनेक देशांमध्ये- विशेषत: अमेरिका, युरोप तसेच उत्तर आफ्रिकेतील देशांमधील फुलांच्या परागकणांचा ॲटलास तयार करण्यात आला आहे. (आशिया खंडाचा पोलन ॲटलास अजून बाकी आहे!) दिवसेंदिवस सर्वत्र मधाचे सेवन वाढत आहे. विशिष्ट प्रकारच्या मधाला मागणी वाढत असताना त्याचे उत्पादन गरजेनुसार होत नसल्यामुळे भेसळीचे प्रमाण वाढते. तसेच अनेक देश इतर देशांतून मधाची आयात करून आपल्या देशाचे लेबल लावून इतर देशांमध्ये निर्यात करतात. अनेकदा एखाद्या पिकाचे नाव देऊन मधाची विक्री केली जाते; परंतु त्या पिकापासून मधाचे उत्पादन घेतलेले नसते.

- अशा प्रकारच्या अनेक कुप्रथांवर बंदी किंवा नियंत्रण आणण्यासाठी मेलिसॉपॅलिनॉलॉजी तपासणी म्हणजेच मधामधील परागकणांची तपासणी करणे अत्यंत आवश्यक आहे. अर्थात हे तंत्रज्ञान नवीन आणि अत्याधुनिक असले, तरीही भविष्यात मधाबद्दल सर्वसामान्यांच्या असलेल्या शंका दूर करून मधाच्या शुद्धतेची हमी देण्यासाठी या प्रकारचे तंत्रज्ञान वापरणे गरजेचे आहे.

**(सौजन्य : पूर्वा कृषिदूत परिवार)** ■